# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/11/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## जबर दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत बोर्डा सराखा ता. रामटेक येथे दिनांक ०३/११/२०२३ चे ०७.३० वा. ते ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– चंद्रशेखर श्रावण नागपुरे, वय ५० वर्ष रा. बोर्डा सराखा ता. रामटेक जि. नागपुर हा आपले घरापुढे हजर असता तेथे फिर्यादीचे भाऊ व आरोपी नामे– दुर्योधन नत्थुजी मेश्राम, रा. बोर्डा ता. रामटेक जि. नागपुर हे उभे होते व फिर्यादीकडे पाहत होते त्यावेळी फिर्यादीने आरोपी याला म्हटले तु माझाकडे काय पाहते असे म्हटले असता त्यांनी शिवीगाळ केली व आरोपी हा घरी जावून लाकडी दंडा घेवून आला व फिर्यादीचे उजव्या पायाचे पोटरीवर मारून जखमी केले व गच्ची पकडून जमीनीवर पाडले त्यामुळे पाय फॅक्चर झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३४ भा.द. वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय पायक मो. नं. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर